(8)

मा. महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका
ठराव क्रमांक :- १/४५५
दिनांक :- २९/७/२००८

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक :- मआ/गवनि/३/१६०७
दिनांक :- २९/७/२००८

विषय :- अधिकार प्रदान करणे बाबत.

संदर्भ :- महापालिका आयुक्त ठ.क्रं. १/४१३ दि. ११.७.०८ .

## अधिकार सुपूर्ती आदेश

पुणे महानगरपालिकेतील गलिच्छ वस्ती निर्मुलन विभागाचे विकेंद्रीकरण झाले असल्याने व कामाची व्याप्ती लक्षात घेता सदरचे काम जलद गतीने पूर्ण करण्याचे दृष्टीने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ (एस) अन्वये '' सक्षम प्राधिकारी'' (गवनि )म्हणून खालील अधिका-यांना पदासमोर दर्शविलेल्या कार्यक्षेत्रा पुरते अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

| अ.क्रं. | पद | देण्यात आलेले अधिकार | कार्यक्षेत्र. |
|---|---|---|---|
| १ | उप आयुक्त वि.क्रं. १ ते ४ पुणे महानगरपालिका | सक्षम प्राधिकारी (गवनि) म्हणून महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा ,निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ४ अन्वये गलिच्छ वस्त्या घोषित करणे, रेकॉर्ड जतन करणे ,५ अन्वये गलिच्छ वस्त्यामध्ये सुधारणा कामकरणे तसेच कलम २२ अन्वये दाखल अर्जावर सुनावणी घेणे व निर्णय देणे तसेच या कायद्यातील सक्षम प्राधिका-यास लागू असलेले सर्व अधिकार व तद् नुषंगिक सर्व कृती. | त्यांचे अधिपत्याखालील कार्यक्षेत्रासाठी. |
| २ | क्षेत्रिय अधिकारी पुणे महानगरपालिका | जागा पहाणी ,प्राथमिक सर्व्हेक्षण अहवाल, रहिवाश्यांची यादी तयार करणे व शिफारसी सह उप आयुक्त वि. क्रं १ ते ४ तथा सक्षम प्राधिकारी (गवनि) यांचे कडे मान्यतेसाठी सादर करणे व तद् नुषंगिक सर्व काम पहाणे. | त्यांचे अधिपत्याखालील कार्यक्षेत्रासाठी. |

वरील प्रमाणे संबंधित अधिका-यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन आणि पुनर्विकास ) अधिनियम १९७१ अन्वये शासनाने वेळोवेळी पारीत केलेले आदेश सूचना या प्रमाणे विहित निकषानुसार कामकाज करावे.

प्रवीण परदेशी

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.

प्रत:- १) आयुक्त ,पुणे महानगरपालिका
२)अतिरिक्त महा.आयुक्त (वि) पुणे महानगरपालिका.
३)अतिरिक्त महा.आयुक्त (ज) पुणे महानगरपालिका.
४)नगर अभियंता ,पुणे महानगरपालिका.
५) उप आयुक्त वि. क्रं १ ते ४ पुणे महानगरपालिका.
६) सर्व क्षेत्रिय अधिकारी,पुणे महानगरपालिका.
७)विशेष कार्याधिकारी (गवनि)पुणे महानगरपालिका.
८) विधी सल्लागार ,पुणे महानगरपालिका.
९) सेवक वर्ग विभाग अधिकारी, पुणे महानगरपालिका.